ISSN 2394- 5303

# printing® Area

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

vised Edition

# INDEX

01) SAKSHAT: INDIA'S INITIATIVE FOR MASSIVE OPEN ONLINE COURSES (MOOCS) ...
**Swati P. Adhe** ||14

02) A STUDY OF MSME'S PERCEPTION OF ADOPTING E-MARKETING ACTIVITIES ...
**Dr. Nilendra Lokhande & Mrs. Ruchita Ajay Kawatwar, Mumbai** ||16

03) Existentialism in Indian English Novels
**Lata** ||21

04) A Study on tourist satisfaction and economic development in Himachal ...
**Dr. M. D. Somani & Mohmmad Idrees, Indore** ||23

05) The Impact of Social Media on Indian Politics
**Dr. Arun S. Pentawar, Dist. Beed** ||28

06) Adjustment of Female Teachers of joint and nuclear family
**Ms. Raji, Gandhinagar, Gujarat** ||33

07) IMPACT OF COVID-19 ON FINANCIAL PERFORMANCE OF CHEMICAL ...
**Dr. Nilendra Lokhande & Ms. Pournima Nivrutti Relekar, Mumbai** ||37

08) JUDICIAL REVIEW: JUDICIAL AND LEGISLATIVE TRADE-OFF
**Seema Sharma Tiwari, Indore** ||42

09) Preparation and Characterization of Nanostructured Cobalt Sulphide ...
**Dr. Chandrakant S. Ulhe, Washim, Maharashtra, India** ||49

10) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक कांदबऱ्यातील स्त्री प्रतिमा
**मोरे पंडित किशनराव, जि.नांदेड** ||53

11) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद
**प्रा. डॉ. महेंद्र विठ्ठल पाटील, जि.धुळे** ||56

12) नांदेड जिल्ह्यातील पीक केंद्रीकरणाचा एक : भौगोलिक अभ्यास
**प्रा. डॉ. यु. एस. कानवटे, नांदेड** ||59

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) नीति के कवि : रहीम
**डॉ.निभा उपाध्याय, अकोला** ||63

14) कर्णाट कालीन मिथिला का स्वर्णिम इतिहास
**डॉ. चन्दा कुमारी, दरभंगा, बिहार** ||65

15) ओमप्रकाश वाल्मिकी की आत्मकथा 'जूठन' में चित्रित सामाजिक व्यथा
**सतिश शामराव मिराशे, जि. नांदेड** ||68

16) ऐतिहासिक संदर्भ में पंडित दीनदयाल उपाध्याय के राजनीतिक चिंतन की प्रासंगिकता
**कुमार नरेन्द्र नीरज, दरभंगा** ||72

17) 'चन्द्रगुप्त' नाटक में निहित राष्ट्रीय सुरक्षा के प्रश्न एवं निदान
**डॉ. निर्मल चक्रधर, जिला—बालाघाट (म०प्र०)** ||76

18) खतरे में हिंदी भाषा और प्रभाकर श्रोत्रिय के विचार
**पवार बळीराम प्रभु & डॉ. गोपाळ स. भोसले, जि. बीड** ||80

19) समकालीन हिन्दी कविता में जल और जमीन से जुड़ी हुई समस्याएँ
**डा. अनीश सिरियक, पाला, केरल** ||83

20) Zooplankton diversity from RuiProject, Osmanabad (MS) India
**Dr. Afreen Rehman Mohammad Abdul Rehman, dist Aurangabad** ||86

21) महिलाओंको सशक्त बनातीं शैक्षिक योजनाएं एवं कार्यक्रम
**डॉ॰अरविंद कुमार, रामपुर (उ॰प्र॰)** ||89

22) राष्ट्राच्या निर्मितीमध्ये महिला चळवळीचा सहभाग
**डॉ. निलिमा. वाय. भोगे, चिखलदरा** ||95

23) मानव विकास (Human Development)
**प्रा.डॉ.विठ्ठल स. जाधव, बीड** ||100

24) बर्टोल्ट ब्रेख्त आणि अण्णाभाऊ साठे — एक टिपण
**नारायण आनंद खराडे & प्रा.डॉ. पुष्पलता राजापुरे तापस, मुंबई** ||103

25) स्वच्छ पेयजल की चुनौती से जूझती आदिम जनजाति 'कमार' — एक ...
**प्रतिमा बेन, रायपर (छ.ग.)** ||106

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

26) भारतातील थेट विदेशी गुंतवणूक
प्रा. डॉ. अशोक टिपरसे, देगलूर ||110

27) हिन्दी सिनेमा के विकास में काल्पनिक पात्रों एवं कहानियों का योगदान
डॉ. हरि किशोर यादव, पटना ||112

28) भक्त शिरोमणि कवि नागरीदास और उनकी चित्र शैली
डॉ. सुरेन्द्र सिंह & डॉ. यदुवीर सिंह खिरवार, जयपुर (राज.) ||119

29) सामाजिक समरसता को मजबूत करती शांति शिक्षा
DR. DHRUB SINGH TOMAR, DISTT- MAINPURI, U.P. ||123

30) नशा एंव आसक्ता व्यसक्ति
डा० भरतजी उपाध्याय, द्वाराहाट (अल्मोड़ा), उत्तराखण्ड ||124

31) शासकीय एवं अशासकीय उच्च माध्यमिक विद्यालयों में कार्यरत शिक्षकों की ...
Deepika Bhatnagar & Dr. Vandana Bhatnagar, Sehore (M.P.) ||129

32) ७३ वी राज्यघटना दुरुस्ती आणि महिलांचे राजकीय सबलीकरण
डॉ. राम पांडूरंग साबदे, जि. लातूर (महाराष्ट्र) ||133

33) बिदर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळाचा भौगोलिक अभ्यास
कनाडे पल्लवी कंटेप्पा, उदगीर ||135

34) राजनैतिक विकास और प्रशासनिक व्यवस्था छत्तीसगढ के ग्रामीण संदर्भ में
Dr.Balendu Tripathi ||138

35) Impact of Information Communication Technology (ICT) on Library ...
Dr.S.T.Sangale, Distt- Beed ||141

36) Social Entrepreneurship in India – Opportunities and Challenges in the ...
Mr.Tushar Dinkarrao Ware, Dist- Beed ||145

37) MISSING CHILDREN - REFERENCE TO ARTICLE 21 & 23 OF THE ...
Hardik K. Raval & Dr. Bharat H Rojasara, Wadhwan cities ||149

38) A Study of Structural Coherence and Organic Unity of the Novel 'The ...
Dr. Dinesh Dattatray Satpute, Warananagar ||152

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

39) RURAL DEVELOPMENT PROGRAMMES AND WOMENS
**Dr. Parasharam N. Basargi, Belgaum** ||154

40) साहित्य अनुसंधान की प्रक्रिया
**Dr. M.S. Kathare, Dist.Latur** ||161

41) Learning Theories (Behaviorism, Cognitivism, Connectivism and ...
**Dr. Archana Pandey, Gorakhpur** ||164

42) Security related issues in Wireless Sensor Network
**Santosh Kumar, Gaya** ||167

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

है, साथ ही चूल्हा खरीदने एवं पहली बार सिलैन्डर भरवाने हेतु किस्त (EMI) की भी सुविधा है। साफ–सुथरे ढ़ग से खाना बनाने, महिलाओं व उनके बच्चों के उत्तम स्वास्थ्य को ध्यान में रखने के उद्देश्य से जुलाई २०१८ तक ५.०८ करोड़ कनैक्शन जारी किए जा चुके हैं।

**१९. सुरक्षित मातृत्व अभियान (PMSMA2016)** इस योजना के अन्तर्गत सभी गर्भवती महिलाओं को प्रत्येक माह की ९ तारीख को व्यापक एवं प्रसवपूर्व देखभाल सम्बन्धी सुविधाएं प्रदान की जाती हैं। गर्भवती महिलाओं को सरकारी स्वास्थ्य केन्द्रों पर उनकी गर्भावस्था की दूसरी और तीसरी तिमाही की अवधि (गर्भावस्था के ४ महीने बाद) के दौरान प्रसवपूर्व देखभाल सेवाओं का न्यूनतम पैकेज (उ.प्र. में छः हजार रुपये) दिया जाता है। निजी क्षेत्र के विशेषज्ञों/चिकित्सकों को हर महीने की ९ तारीख को उनके जिलों में सरकारी चिकित्सकों के प्रयासों के साथ स्वैच्छिक सेवाएं प्रदान करने के लिए प्रोत्साहित भी किया जाता है। गर्भावस्था में नियमित जांचें जरूरी हैं इससे गर्भ में किसी भी प्रकार की जटिलता का पता लग जाता है और आवश्यक पोषक तत्व आयरन, फोलिक एसिड एवं कैल्शियम आदि की व्यवस्था भी हो जाती है।

**२०. एकलव्य मॉडल स्कूल (२०१८)–**: नवोदय विद्यालय की तर्ज पर २०२२ तक अनुसूचित जनजाति के छात्रों के लिए ६ से १२ वीं तक की शिक्षा पूर्ण करने हेतु ऐसे स्कूल खोले जाएंगे। ५० प्रतिशत से अधिक जनजाति वाले क्षेत्रों और २० हजार से अधिक आदिवासी वाले प्रत्येक ब्लाक में इन स्कूलों की स्थापना गुणवत्तापूर्ण शिक्षा उपलब्ध कराने के उद्देश्य से की गयी है। इन स्कूलो में पचास फीसदी से ज्यादा हिस्सेदारी बालिकाओं की है। यहाँ खेल और कौशल विकास में प्रशिक्षण देने के अलावा स्थानीय कला और संस्कृति के संरक्षण की भी विशेष सुविधाएं होंगी।

**संदर्भ**


कुरुक्षेत्र बालिका सशक्तीकरण विशेषांक, सूचना एवं प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली वर्ष–६२, अंक–०३, जनवरी–२०१३

योजना, नारी सशक्तीकरण विशेषांक, सूचना एवं प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली सितम्बर–२०१६

योजना महिला सशक्तीकरण विशेषांक, सूचना एवं प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली अक्टूबर–२०१


**22**

# राष्ट्राच्या निर्मितीमध्ये महिला चळवळीचा सहभाग


**डॉ. निलिमा. वाय. भोगे**

सहयोगी प्राध्यापक,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा


**********

सामाजिक चळवळींचा इतिहास फार प्राचिन आहे. अगदी प्राचीन काळापासून सामाजिक चळवळींचे अस्तीत्व आपणास दिसून येते. समाजामध्ये जसजसे परीवर्तन होत जाते त्यासोबतच नविन प्रश्न देखील उदयास येतात आणि म्हणूनच या नवनविन प्रश्नांची सोडवनूक करण्याकरिता नवनविन चळवळी उदयास येतात. उदा. मोठया प्रमाणात होऊ घातलेल्या औद्योगिकरणामुळे पर्यावरण संदर्भित चळवळी, विस्तापित लोकांच्या पुर्नवसनासंबंधी चळवळी उदयास आल्या. एकाधिकरशाही/राजेशाही शासनव्यवस्थेपेक्षा लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये चळवळींना अधिक बळ मिळत असते. औद्योगीकरणामुळे दळणवळणाच्या साधनांमध्ये झालेली वाढ, शिक्षणाचा मोठया प्रमाणात झालेला प्रचार आणि प्रसार, विचार स्वातंत्र्य, उदारमतवादी धोरण आणि लोकांमध्ये झालेल्या जाणिव जागृतीमधून विशेषत: महिलांमध्ये चळवळीचे प्रमाण वाढले आहे. सामाजिक चळवळी हया सामाजिक सुधारणांची जुळलेल्या आहे स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये एक व्यापक पार्श्वभूमी त्यांना लाभलेली आहे.

समाज जीवनामध्ये परंपरावादी मुल्यांशी बांधिलकी जपणारे लोक हे चळवळीपासून फारकत घेतात तर ज्या लोकांना आपला हक्क, अधिकारांविषयी समाजातील समस्यांविषयी तसेच अन्याय अत्याचाराविषयी तिव्रतेने जाणिव होते. यासोबतच

स्तावित व्यवस्थेमध्ये बदल झाला पाहिजे असे ज्यांना टते अशा व्यक्ती प्रत्यक्षात जाणिव जागृती करून घटणात्मक बांधनी करतात आणि उदिष्टाभिमूख क्रिया रू लागतात. अशा अधिकांश संख्या असलेल्या कांच्या वर्तनास म्हणजेच समूहवर्तनास सामाजिक ळवळ म्हणतात.

सामाजिक चळवळ म्हणजे सामूहिक वर्तन य. प्रत्येक चळवळीशी एका निश्चीत उदिष्ट, कार्यक्षेत्र, यमावली, शिस्त, बंधने असतात. उदिष्टे साध्य रण्याकरिता कार्यक्रमाची आखणी केलेली असते. ामध्ये बॅनर, पोष्टर, घोषणा, ध्वज, गाणी, पोशाख, भा, पत्रके, तत्वज्ञान इत्यादी घटकांचा समावेश असतो. मंडळी आपल्याला चळवळीची भुमिका कार्यकर्त्यांना वून देतात आणि चळवळीचे नेतृत्व करतात.

**ामाजिक चळवळीचा अर्थ:**

**र्ट ब्लुमर यांच्या मते,** "सामाजिक व्यवस्था तापीत करण्यासाठी केलेले सांघीक प्रयत्न म्हणजे माजिक चळवळ होय."

**डबर्ग व इतर यांच्या मते,** "बृहत समाजातील कांच्या अभिवृत्ती, वर्तन आणि सामाजिक संबंधात योजीत रितीने परिवर्तन घडविण्यात स्वेच्छेने गुंतलेल्या कांच्या प्रयत्नांना सामाजिक चळवळी म्हणतात."

**र. एस. ए. राव यांच्या मते,** "समाजातील एका कने विशिष्ट विचार प्रणालीस अनुसरून सामूहिक त्नाद्वारे समाजात आंशिक किंवा संपूर्ण परिवर्तनासाठी लेले संघटित प्रयत्न म्हणजे साामाजिक चळवळ य."

**नि विल्सन यांच्या मते,** "सामाजिक व्यवस्थेत संस्थीकृत साधणांच्या द्वारे परिवर्तन घडवून आणणे वा व्यापक परिवर्तनास प्रतिकार करण्याचे जाणिवपुर्वक मूहिक, संघटीत प्रयत्न म्हणजे सामुहिक चळवळ य."

वरील व्याख्यांवरून आपल्या असे निदर्शनास ते की,"सामाजिक चळवळ म्हणजे प्रस्तापित माव्यवस्थेत बदल घडवून आणण्याकरिता अनेक लोक स्वच्छेने एकत्र येतात व समाजातिल विशेषता: अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा तसेच अधिकांश लोकांचा विकास साध्य करण्याच्या दृष्टिने, संविधानिक मुल्यांचा आधार घेउन प्रयत्न करीत असतात."

संशोधनकर्ती ही एक स्त्री असून तिचा अनेक संस्था, संघटनांशी जुळलेली आहे. मागील १८ वर्षापासून ती प्राध्यापक आहे. त्यामुळे तिला चळवळीविषयी अधिक जाणिव आहे. याच दृष्टिकोनातून तसेच तिच्या अनुभवातून, अनेक महिला चळवळीमधिल कार्यकर्त्यांच्या मुलाखती व निरिक्षण तसेच दुय्यम स्त्रोत करीता अनेक पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, मासिके यांचा आधार घेवून प्रस्तूत विषयाची निवड करण्यात आली.

**अध्ययनाची उदिष्टये:**

१. सामाजिक चळवळी व सुधारणात्मक चळवळीविषयी जाणून घेणे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळीमध्ये महिलांचा सहभाग जाणून घेणे.

३. महिलांच्या संघटनात्मक चळवळीविषयी जाणून घेणे.

४. महिलांचा सुधारणात्मक चळवळीमधिल सहभाग जाणून घेणे.

५. महिलांचा राजकीय चळवळींमधील सहभाग जाणून घेणे.

**गृहितकृत्ये:**

१. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये महिलांच्या स्वतंत्र संघटना नव्हत्या.

२. सुधारणात्मक व राजकिय परिवर्तनाकरिता महिला व पुरूषांनी एकत्र चळवळी उभ्या केल्या.

३. स्वातंत्र्यानंतर महिलांनी स्वता:चे संघटन उभे केले व चळवळीमध्ये योगदान दिले.

४. राष्ट्रउभारणीमध्ये महिलांचे महत्वपुर्ण योगदान आहे.

भारतातील स्त्री चळवळीला खऱ्या अर्थाने एकोनिसाव्या शतकात सुरूवात झाली परंतू या कालखंडमध्ये अनेक स्त्री चळवळीचे नेतृत्व हे पुरूष

वर्गाकडे असलेले दिसून येते समाजसुधारणा घडविणाऱ्या चळवळीमध्ये प्रथमता स्त्री शिक्षणाचा पाया रोवला गेला. स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करूण देण्याकरिता सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतीराव फुले यांचे अथक परिश्रम आहे. या दाम्पत्यांनी अनेक हालअपेष्ठा सहन करून स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. एकोनविसाव्या शतकामध्येच अनेक जाचक रूढी, प्रथा, परंपरा होत्या त्यांनाही बंद करण्याकरीता राजाराम मोहनरॉय सोबत अनेक स्त्रियांनी सहभाग नोंदवून या जाचक रूढी, प्रथा विरोधात कायदे करण्याकरिता सरकारला भाग पाडले व त्यामुळे या जाचक, वाईट, प्रथा, परंपरा बंद झाल्या आणि इथुनच स्त्रियांनी आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. पुढे राष्ट्रवादी चळवळीमध्ये स्त्रियांनी महत्वपुर्ण योगदान दिले. इथे आवर्जून उल्लेख करावा लागेल की, स्त्री चळवळीच्या संदर्भात समाजसुधारणा व राष्ट्रवादी चळवळीचा विचार करण्याबरोबरच कामगार चळवळ, जातीविरोधी चळवळ, अस्पृश्यता चळवळ यासारख्या भिन्न चळवळीमधून स्त्री प्रश्नांवर झालेल्या मंथनाचे, या चळवळींमधिल स्त्रियांच्या सहभागाचे योगदान लक्षात येणे महत्वाचे आहे.

स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याकरिता सामाजिक सुधारणात्मक चळवळींचे महत्वपुर्ण योगदान आहे. एकोणिसाव्या शतकातिल सामाजिक सुधारणा चळवळ प्रामुख्याने सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, यासारख्या स्त्रियांशी निगडीत प्रश्नांवर केंद्रित होती. या सोबतच सर्वात महत्वाचे म्हणजे स्त्री शिक्षणाचा प्रश्न होय. एकोणविसाव्या शतकातील स्त्री प्रश्नाची जडण घडण आधुनिकता आणि राजकीय सत्तेच्या संदर्भात झालेली दिसते. साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, विचारसरणीतील परस्पर संघर्ष स्त्रियांच्या प्रश्नाच्या आधारे उभारला गेला. यातून नव्याने उदयाला आलेल्या अभिजन वर्गातिल पुरोगामी नेत्यांनी स्त्रिविषयक रानटी व क्रुर स्वरूपाच्या प्रथा बंद करण्याकरिता सुधारणात्मक चळवळी उभारल्या.

आधुनिकता, राष्ट्रवाद आणि प्रगतीच्या नव्या विचारसरणीमध्ये स्त्रियांची प्रगती हा एक महत्वाचा निर्देशांक मानला गेला, म्हणूनच सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये कायदेशिर सुधारणांवर भर देण्यात आला. १८२९ मध्ये सतिप्रथा कायदयाने बंद करण्यात आली. १८५६ मध्ये विधवा पुर्नविवाहाचा कायदा करण्यात आला. १८२० ते १८५० च्या दरम्यान ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज यासारख्या समाजसुधारणा संघटनांचे नेतश्त्व शहरी उच्चवर्णिय उच्चजातीतिल पुरूषांकडे असले तरी त्यांच्यामुळे अनेक स्त्रियांना सुधारणांचे फायदे मिळाले याच काळामध्ये सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी मुलींकरिता शाळा काढून शिक्षणाची दालने उघडली. यामधूनच स्त्रियांना प्रगतीच्या वाटा मोकळया झाल्या परंतू फार कमी महिला विकासाच्या प्रवाहात आल्या.

**स्त्रियांच्या संघटना व सहभाग :**

समाजसुधारणा चळवळी व स्त्रियांकरिता फुले दांम्पत्यांनी खुले केलेले शिक्षण यामधून अनेक स्त्रिया, डॉक्टर्स, शिक्षक, वकिल आणि विचारवंत तयार झाल्या. शहरी भागामध्ये स्त्रियांच्या कल्याणासाठी अनेक संघटना सुरू झाल्या. १९०५ च्या आसपास स्त्रियांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या महिलासेवा समाज, भगीनी समाज, आर्य समाज, आर्य महिला समाज, अंजूमन–ए–ख्वाताईन–ए–इस्लाम, यमनबाई प्रसुतिगृह व बालकल्याण समितीसारख्या अनेक संघटना उभ्या राहिल्या. १९१० – २० च्या दशाकामध्ये राष्ट्रिय पातळीवर स्त्रियांचे संघटन उभे राहीले. १९७५ मध्ये ॲनिबेझंट यांच्या नेतृत्वाखाली 'भारतीय स्त्री संघटनेची' (Indian Women's Association) स्थापना झाली. यानंतर स्वराज्याच्या चळवळीमध्ये स्त्रियांनी मोठया प्रमाणात सहभागी व्हावे असे आव्हान करण्यात आले. त्याला खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

१९२४ मध्ये स्त्री चळवळीतील विविध मतप्रवाह आणि विचारांचे समानत्व प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून अखिल भारतीय महिला परिषदेचा (AIWIC) All

India Women Conference ची स्थापना करण्यात आली. व या संघटनेनी समान हक्काचा आग्रह धरला. शिक्षणाच्या मागणीचा विस्तार करूण सहशिक्षणाची नविन मागणी करण्यात आली तसेच कायदेशिर सुधारणा अंतर्गत विवाह, घटस्पोट आणि मालमत्तेचे अधिकार, आर्थिक समानतेमध्ये विधवांकरिता निवृत्तीवेतन, नवऱ्याच्या उत्पन्नात बायकोचा अधिकार याबरोबरच गर्भपाताचा हक्क यासारख्या अनेक नविन मागण्या करण्यात आल्या.

१९४० च्या सुमारास स्वातंत्र्याचा लढा हा तिव्र स्वरूपाचा झाला. त्यामुळे स्त्रिचळवळीपुढे देखील राजकिय स्वातंत्र्य हा महत्वपुर्ण मद्दा आला. १९४६ च्या 'भारत छोडो' आंदोलनास देशभरातील हजारो स्त्रियांनी रस्त्यावर उतरून भूमिगत होवून समांतर सरकारे स्थापण्यात सहभागी होवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विशेषत: बंगालमध्ये बेकायदेशीर ठरणाऱ्या कश्त्यात सहभागी झालेल्या अनेक स्त्रिया आंदोलनात बळी पडल्या. स्वातंत्र्यचळवळीचा प्रभाव संपूर्ण भारतीय नागरीकांवर एवढा झाला की, स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न जवळपास सुटण्यातच जमा धरला होता. राजकीय स्वातंत्र्या बरोबरच स्त्री पुरूष समता निर्माण होईल असा आशावाद चळवळीमध्ये निर्माण झाला.

**महात्मा गांधींची चळवळ व स्त्रिया:**

१९३० पासून गांधीजींनी ज्या चळवळी उभारल्या उदा. सविनय कायदेभंगाची चळवळ, असहकार इत्यादी या चळवळमध्ये मोठया प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला. गांधीजींच्या मते, गरोदरपण व बाळंतपण या दोन प्रकियांमधून जाणाऱ्या स्त्रिया जास्त चांगल्या प्रकारे शांती आणि अहिंसेचा प्रचार करू शकतात कारण त्यांच्या मध्ये सर्व प्रकारच्या तिव्र वेदना सहन करण्याची उपजत ताकद असते.

राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांकडे घराचे अस्तीत्व टिकविण्याच्या दृष्टिने पाहिले गेले. १९२० च्या सुमारास स्त्री चळवळीत स्त्रियांच्या श्रमाचे नविन भान निर्माण झाले, पण राष्ट्रीय चळवळीच्या माध्यमॊतून स्त्रियांच्या श्रमाकडे दुर्लक्ष करण्यात आले. राष्ट्रीय चळवळीतमध्ये जेव्हा स्त्रियांच्या रोजगाराचा प्रश्न चर्चेत आला तेव्हा स्त्रियांचे श्रम पुरूषांच्या श्रमाच्या तुलनेने दुय्यम धरले गेले. याच काळाध्ये स्त्रियांचा कामगार चळवळीतील सहभाग लक्षनिय रित्या वाढत होता. १९२८ – २९ च्या मुंबई गिरणी कामगार संपात स्त्रियांचा मोठया संख्येने सहभाग होता. भारतात १९३० नंतर कम्युनिष्टांनी स्त्री प्रश्नासंदर्भात भुमिका घ्यायला सुरूवात केली. मणीबेन कारा, उषाताई अंगे, पार्वती भोर, संतोषीकुमार देवी व प्रभावती देवी या स्त्रियांनी कामगारांचे प्रतिनिधी म्हणून कार्य केले. गोदावरी परूळेकर व श्रीमती भालेराव यांनी Servants of Indian Society च्या महिला विभागाची स्थापणा केली आणि स्त्री कामगारांच्या समस्यांवर मोठे काम केले.

**कम्युनिष्टांच्या चळवळी आणि स्त्रिया:**

डाव्या चळवळीतील विचारवंत मंडळी कार्यव्यवस्थेला शोषणाचे मुळ मानतात. वर्गव्यवस्थेच्या जाणीवेकडे वृंदा करात सकारात्मक दृष्टिने पाहतात. त्यांच्या मते, भारतातील स्त्री चळवळीत सुरूवातीपासून स्त्रियांच्या दुय्यमत्वाच्या व्यापक आर्थिक, सामाजिक संदर्भ आणि राज्यसंस्थेला धोरणाशी असलेल्या संबंधाचे भान होते.

कनक मुखर्जीच्या मते १९३० च्या सुमारास गांधीजींची राष्ट्रीय चळवळ, साम्यवादी चळवळ आणि क्रांतीज्योती चळवळ या सर्वांचे अंतिमउदिष्ट ब्रिटिश राजवटीला उलथवून टाकणे हेच असल्यामुळे भुमिका आणि हितसंबंधाचा संघर्ष नव्हता पुढे कांग्रेसच्या ब्रिटिशांसंबंधी मवाळ व अस्थिर धोरणांमुळे अनेक स्त्रियांचा अपेक्षा भंग झाला व त्या कम्युनिष्ट चळवळींकडे वळल्या. अहिल्या रांगणेकर, कणक मुखर्जी, इला भट्टाचार्य, विमल रणदिवे यासारख्या अनेक स्त्रिया कॉग्रेसमधून साम्यवादी विचारसरणीकडे वळल्या व त्यांनी अनेक आंदोलनामध्ये सहभाग घेतला. मग ते आंदोलन कामगारांचे वा आदिवासींचे असो की भूमिहिनांचे असो यासाठी त्यांना तुरूंगवासात जावे लागले, अपार हाल

अपेक्षा सोसाव्या लागल्या. १९७० च्या दशकामध्ये सुरू झालेल्या अनेक जणआंदोलनामध्ये याच चळवळीतील स्त्रियांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.

'ब्रेकिंग बॅरिअर्स' (बंधने झुगारतांना) या पार्वती मेनन यांनी लिहीलेल्या पुस्तकात डाव्या विचार सरणीच्या, शोषीतांच्या विकासासाठी आयुष्यभर झटलेल्या व AIDWAC (All India Democratic Women's Association) च्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतलेल्या बारा स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. या पुस्तकात समाजवादी परिवर्तनाच्या दिशेने स्त्रियांच्या मुक्तीसाठी चळवळ उभारलेल्या स्त्रियांच्या योगदानावर प्रभाव पडतो.

विमल रणदिवे आणि अहिल्या रांगणेकर या दोषी १९४३ मध्ये श्रमिक स्त्रियांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी स्थापन झालेल्या परळ महिला संघाच्या सभासद कार्यकर्त्या होत्या. सुशिला गोपालन या केरळ संघाच्या संस्थापक सदस्य होत्या. मल्लू स्वराज्यम यांचा आंध्रप्रदेश महिला संघाच्या स्थापनेत पुढाकार होता. या सामान्य स्त्रियांना आपआपल्या प्रांतातिल संघटन व कृतिकार्याच्या अनुभवाचा समृध्द वारसा AIDWA कामी आणला. अहिल्या रांगणेकर, कनक मुखर्जी, पापा उमानाथन अशा स्त्रियांनी अनेक आंदोलनामध्ये सहभागी होऊन विविध प्रश्नावर प्रकाश टाकला कित्येकदा तुरूंगवास भोगला. पोलीसांचे अत्याचार सहन केले. इला भट्टाचार्यांनी आदिवासींसाठी अनेक आंदोलन केली त्यांचे संघटन घडवून आणले. सुशिला गोपालन यांनी काथ्या कामगारांसाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले. अनेक स्त्रियांनी **आंदोलनांमध्ये सहभागी होवून आपले प्राण पणाला लावले.**

**निष्कर्ष :**

वरील सर्व विश्लेषणावरून आपल्या असे निदर्शनास येते की, एक आदर्श राष्ट्र निर्माण करण्यासाठी तसेच सर्वसमावेशक समतेवर आधारीत राष्ट्र उभे करण्याकरिता भारतातील स्त्रियांचे फार महत्वपुर्ण योगदान आहे. अगदी सुरूवातीला/ स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये महिलांच्या प्रश्नांवर जी संघटना उभी राहिली त्यांचे नेतृत्व जरी पुरूष वर्गाने केले असले तरी त्यामध्ये मोठया प्रमाणात स्त्रियांचा सहभाग होता. स्त्रियांच्या नेतृत्वामध्ये देखील अनेक आंदोलने करण्यात आली. कोणतेही राष्ट्र उभे करण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा विचार करावा लागतो. परंतू जर समाजातील एका वर्गाकडे दुर्लक्ष होत असेल तर त्या राष्ट्राच्या विकासात अडथळे येत असतात आणि मग खऱ्या अर्थाने अशा वर्गात जाणिव जागृतीची गरज भासते ही जाणिव जागश्ती झाल्यानंतर अनेक प्रश्नांवर हा वर्ग उभा ठाकतो व वेगवेगळया संघटनांच्या माध्यमातून आंदोलने/चळवळी मध्ये असंख्य स्त्रियांचा सहभाग मिळत गेला व प्रस्तावित समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक सुधारणा घडत गेल्या व त्यामधुन राष्ट्राचा विकास साध्य होण्यास एक प्रकारे मदतच झाली. यासोबतच स्वातंत्र्यपुर्व कालखंडामध्ये देखिल स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनामध्ये मोठया प्रमाणात महिलांचा सहभाग होता. त्यामुळे स्वातंत्र्याच्या चळवळीलाही गती प्राप्त झाली. राजकिय व्यवस्थेमध्ये सुध्दा महिलांनी सहभाग घेवून एक समताधिष्ठित राष्ट्र उभे करण्याकरीता सहकार्य केले. एकंदरीत कोणतेही राष्ट्र उभे करण्याकरिता महिलांचा सहभाग फार महत्वपुर्ण आहे, कारण राष्ट्राच्या लोकसंख्येत त्यांची संख्या पन्नास टक्के असते.

भारतामध्ये स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्या प्रत्येक चळवळीमध्ये महिलांचे महत्वपुर्ण योगदान राहीलेले आहे. मग त्या चळवळी सुधारणात्मक, सुरक्षात्मक, सामाजिक, आर्थिक, राजकिय, आदिवासी, कामगार, दलीत, पर्यावरणात्मक, पुर्णवसनात्मक, समताधिष्ठित इत्यादी कुठल्याही स्वरूपाच्या असोत. काही चळवळीचे नेतृत्व पुरूषांनी केले असले तरी महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग होता तर काही चळवळीचे नेतृत्व स्वतः महिला करीत होत्या. चळवळी हया समाजाचा पर्यायाने देशाचा विकास साध्या करण्याच्या दृष्टिने महत्वपुर्ण असतात त्यामुळे राष्ट्रउभारणीमध्ये महिला

व महिला चळवळींचे फार मोठे योगदान आहे.

**संदर्भग्रंथसुची:**


- भागवत विद्युत (२००४) 'स्त्रीप्रश्नाची वाटचाल' प्रतिमा प्रकाशन पुणे.
- मून मिनाक्षी आणि पवार उर्मिला (२०००) 'आम्ही इतिहास घडवीला' सुगावा प्रकाशन पुणे.
- देव वि. रा. (२००२) 'स्त्री चळवळीची वाटचाल' सुगावा प्रकाशन पुणे.
- गाडगीळ मालती (२००२) 'आगळे आंदोलने, वेगळे आंदोलक' सुगावा प्रकाशन पुणे.
- खडसे भा.की. (२००३) 'समाजशास्त्राची मुलतत्वे' हिमालया पब्लिशिंग हाउस मुंबई.
- देहाडराय स्वाती (२००६) 'लिंगभेदाचे राजकारण आणि जमातवाद' प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- गांधी नंदिता व शहा नंदिता (१९९२) 'स्त्री संघर्षाची नवी रूपे' पॉप्युलर प्रकाशन पुणे...


❑❑❑

23

# मानव विकास
## (Human Development)


**प्रा.डॉ.विठ्ठल स. जाधव**

सहा. प्राध्यापक तथा विभाग प्रमुख,लोकप्रशासनशास्त्र, कालिकादेवी महाविद्यालय, शिरुर (का.), बीड


**प्रस्तावना**

मानव विकास, आरोग्य भौतिक पर्यावरण यातून आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्या पर्यंत सर्व प्रकारच्या मानव पर्यायांना समावेशित करत लोकांच्या पर्यायांनमध्ये विस्तार आणि त्यांच्या शिक्षण, आरोग्य सेवा त्याच बरोबर सक्षमी करणाच्या संधी मध्ये वाढ करणारी प्रक्रिया आहे. डॉ.अतूल नौबदे मानव विकास ही एक व्यापक संकल्पना असून यामध्ये मानवाच्या सर्वांगीण कामाचा विचार महत्त्वाचा आहे. ही संकल्पना लक्षात घेतांना आपणास डॉ.महेबुब उल हक व नोबेल विजेते डॉ.अमर्त्य सेन यांच्या विचारांचा आढावा घेणे क्रम प्राप्त ठरते. डॉ.मेहबुब उल हक्क म्हणतात, "मानवास जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन देणे. या संधी अमर्याद व वेळेनुरुप बदलता येणाऱ्या असाव्यात मानवाची मिळकत ही उत्पन्न वाढीच्या आकड्यात दिसण्या ऐवजी ज्ञानवृध्दी, उत्तम आहार व आरोग्य सुविधा, सुरक्षित जीवनमान, शारीरिक वेदना व गुन्हेगारी पासून सुरक्षितता, फावला वेळ घालवण्याचे समाधान, राजकीय व सांस्कृतिक स्वातंत्र्य यात दिसेल. त्याच बरोबर विकासाचा मुल्य उद्देश मानवासाठी अशा सामाजिक वातावरणाची निर्मिती करणे ज्यात आरोग्य संपन्न व नाविण्यपूर्ण जीवन जगता येईल असा असावा. डॉ.अमर्त्यसेन मानव विकास संकल्पना मांडतांना म्हणतात की, 'मानव विकास' हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्यात मानवी जीवनाचा एक भाग असलेल्या अर्थव्यवस्थेच्या विकासापेक्षा तेथील मानवी जीवन वृध्दींगत, विकसित होणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या पहिल्या अहवालानुसार मानव विकास म्हणजे लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया होय. मानवाचा केवळ आर्थिक विकासच नव्हे, तर त्या सोबतच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, मानसिक, सांस्कृतिक इत्यादी अशा सर्व अंगानी विकास होणे म्हणजे 'मानव विकास' होय. मानव विकास

www.vidyawarta.com

All things in one Educational Website

- College & University's News
- Academic Updates
- API Guide Lines
- INternational Research Journals
- ISBN Books
- Call for Papers
- Conference & Seminar Alerts
- Free Book, PDF Articles
- Motivational Quotes
- Maharashtra Culture
- Ph.D.&M.Phil.
- Set.Net.Exams Date

Indexed



**Edit By**

Dr. Gholap Bapu Ganpat

Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

(Maharashtra, India)

Cell : +91 75 88 05 76 95



₹ 400/-

**Publisher & Owner**

Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126

**(Maharashtra) Mob.09850203295**

E-mail: vidyawarta@gmail.com

**www.vidyawarta.com**

**ISSN 2394- 5303**